# प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे कार्यालय

"वन भवन"रामगिरी रोड,सिव्हील लाईन्स, नागपूर

दुरध्वनी (०७१२) २५५६९१२,२५४९५६३, फॅक्स २५५३०१३, ई -मेल :pccfwl_ngp@sancharnet.in


१९१

**विषय :-** राज्य वन्यजीव मंडळाच्या दि. ११/१२/०६ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृतांत

क्रमांक:-कक्ष-२३(६)/प्रक्र.११३/४३८९/०६-०७

नागपूर- दि- १७-०३-२००७

प्रति,

सदस्य, राज्य वन्यजीव मंडळ,

राज्य वन्यजीव मंडळाची २ री बैठक वनसभागृह, सेमीनरी हिल्स, नागपूर येथे झाली. मा. अध्यक्षांनी मंजूर केलेल्या कार्यवृत्तांत यासोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :** वरीलप्रमाणे

*मुळ प्रत प्रधान मुख्य वनसंरक्षक(वजी) याचे कडुन अनुमोदित*

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकरिता

**प्रतिलिपी :-**

१. प्रधान सचिव (वने) महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांना सहपत्रासह सस्नेह अग्रेषित.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहीतीसाठी सहपत्रासह समादराने अग्रेषित.
३. मा.अध्यक्ष, राज्य वन्यजीव मंडळ आणि मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सचिव यांना माहीतीकरीता सहपत्रासह सस्नेह अग्रेषित.
४. मा.उपाध्यक्ष, राज्य वन्यजीव मंडळ आणि मा. मंत्री (वने) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सचिव यांना माहीतीकरीता सहपत्रासह सस्नेह अग्रेषित.
५. मुख्य वनसरंक्षक/वनसंरक्षक (प्रा /वजी) यांना माहीती करीता अग्रेषित.

## राज्य वन्यजीव मंडळाची व्दितीय सभा दिनांक ११-१२-२००६ चा कार्यवृतांत

राज्य वन्यजीव मंडळाची व्दितीय सभा दिनांक ११-१२-२००६ ला सकाळी १० वाजता मा. नामदार श्री विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री तथा अध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ यांचे अध्यक्षतेखाली व मा. नामदार श्री बबनरावजी पाचपुते मंत्री (वने) तथा उपाध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ यांचे उपस्थितीत वन सभागृह, सेमिनरी हिल्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित सदस्यांची यादी यासोबत जोडण्यात येत आहे.

२.०० माननीय मुख्यमंत्री तथा अध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ श्री विलासरावजी देशमुख यांचे स्वागत प्रधान सचिव (वने) यांनी केले व मा. मंत्री (वने) यांचे स्वागत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा मुख्य वन्यजीव रक्षक यांनी केले. त्यानंतर राज्य वन्यजीव मंडळाचे एक सदस्य श्री गोविंद घारे यांचे निधन झाल्याबाबत सभेत १ मिनिट मौन धारण करुन श्रध्दांजली अर्पित करण्यात आली.

३.०० प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) तथा मुख्य वन्यजीव रक्षक व सदस्य सचिव राज्य वन्यजीव मंडळ यांनी वन्यजीवांचे व्यवस्थापनांचे सद्यस्थितीबाबत सादरीकरण केले. त्यानंतर लेडी बेलींडा राईट, कार्यकारी निर्देशक, भारतीय वन्यजीव संरक्षण संस्था (WPSI), नवी दिल्ली तथा सदस्य राज्य वन्यजीव मंडळ, यांनी अवैध वन्यप्राण्यांच्या कातडयांचे तस्करीबाबत सादरीकरण केले. भारतातून बिबट व वाघ यांचे कातडयांची तस्करी तिबेट व चीन देशात करण्यात येत असून त्यावर पुरेशे नियंत्रण नसल्याचे स्पष्ट पुरावे दाखविले. त्यानंतर वन्यजीव मंडळाच्या सभेच्या विषयसूचीनुसार चर्चा करण्यात आली.

४.०० प्रथम विषयसुचीनुसार राज्य वन्यजीव मंडळाची पहिली बैठक दिनांक २०-१०-२००५ चा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला. या कार्यवृत्तांतानुसार करावयाच्या कार्यवाहीची सद्यस्थिती सदस्य सचिवांनी सभेसमोर मांडली. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्या | झालेली चर्चा | निर्णय |
|---|---|---|---|
| १ | प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सदस्य सचिव, राज्य वन्यजीव मंडळ यांनी जायकवाडी अभयारण्यातील चौकशी अधिका-यांचे आदेशांचे एकसुत्रीकरण करण्यासाठी बी.एन.एच.एस संस्थेने निकटच्या काळात अभ्यास करण्याची शक्यता नसल्याचे कळविल्यामुळे यशदा संस्था पुणे यांचे सोबत सामंजस्य करार (MOU)करण्यात येत असल्याचे सांगितले. | त्यावर श्री दिलीप यार्डी सदस्य राज्य वन्यजीव मंडळ यांनी सदर अभ्यासासाठी आपली तयारी दर्शविली तसेच औरंगाबाद विद्यापिठाचा पर्यावरण विभाग सुध्दा यासाठी मदत करण्यास तयार असल्याचे सांगितले. | अभ्यासासाठी यशदा संस्थेसोबतच श्री दिलीप यार्डी व औरंगाबाद विद्यापिठाचा पर्यावरण विभागाचे सहकार्य घेण्यात यावे. |
| २ | त्यानंतर ईसापूर अभयारण्याच्या निर्मितीबाबत पाटबंधारे विभागा सोबत | | सदर बैठक त्वरीत आयोजित करण्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | बैठक घेवून तोडगा काढण्यासंबंधी शासन स्तरावर कार्यवाही लवकरच होत असल्याची माहिती सदस्य सचिवांनी दिली. | | यावी. |
| ३ | प्रस्तावित मानसिंगदेव अभयारण्याच्या क्षेत्रामध्ये वन विकास महामंडळाचे क्षेत्र समाविष्ट करावयाचे आहे. याबाबत संयुक्त तपासणी करण्यात येत असून प्रस्ताव लवकरच शासनास सादर करण्यात येईल, असे सदस्य सचिव यांनी प्रतिपादन केले. | श्री दिलीप गोडे सदस्य राज्य वन्यजीव मंडळ यांनी या क्षेत्रासाठी वेगळयाने व्यवस्थापन आराखडे करण्यात यावे असे सुचविले. त्यावर सदस्य सचिवांनी वन विकास महामंडळाने त्यांचे अधिनस्थ असलेल्या क्षेत्रासाठी कार्य आयोजना केन्द्र सरकारच्या परवानगीने यापूर्वीच तयार केली असून त्यामध्ये वन्यजीव व्यवस्थापन समाविष्ट केलेले आहे असे निदर्शनास आणून दिले. | वेगळया कार्य आयोजनाची आवश्यकता नाही. तथापि, अभयारण्याचा प्रस्ताव लवकर सादर करण्यात यावा. |
| ४ | कोपेला कोलामार्का येथील क्षेत्रासाठी संवर्धन राखीव किंवा समाज राखीव क्षेत्र जाहीर करावयाची कार्यवाही सुरु असून त्याबाबत स्थानीक लोकांशी चर्चा करण्यात येत आहे आणि या कामासाठी अशासकीय सदस्यांची मदत आवश्यक असल्याची बाब सदस्य सचिवांनी सभागृहाच्या नजरेत आणून दिली. | त्यावर श्री दिलीप गोडे, सदस्य यांनी यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करु अशी हमी दिली. | अशासकीय सदस्यांच्या मदतीने प्रस्तावाची संभाव्यता पडताळावी. |
| ५ | "वन्यजीव" प्राधान्य क्षेत्र म्हणून जाहीर झाले आणि चालू वर्षाच्या अर्थसंकल्पातील नियतव्ययात मोठया प्रमाणात वाढ झाली असल्याचे सदस्य सचिवांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली. | यावर श्री देवी गोयनका प्रतिनिधी बीएनएचएस यांनी सांगितले की सदर बाब ही अत्यंत महत्वाची असून याकडे पाहिजे तेवढे प्राधान्य दिले जात नाही. ही खंत व्यक्त केली. | मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष यांनी यासाठी काही काळ लागेलच असे सांगितले. तथापी निश्चितच अनुदानात वाढ करण्यात येईल याची हमी दिली. |
| ६ | ताडोबा-अंधारी, राधानगरी, चांदोली इत्यादि संरक्षित क्षेत्राचे विस्तारीकरण करणे व महाबळेश्वर | या संदर्भात सदस्य सचिवांनी विस्तारीकरणचे बाबत होत असलेली प्रगतीबाबत माहिती | मा. मुख्यमंत्री यांनी सांगितले कि, विस्तारीकरण करित |